आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२४ एप्रिल २०२५ - गुरुवार

## <u>ठळक बातम्या</u>

- पहलगाम हल्ल्यानंतर जम्मू कश्मीरमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातल्या पर्यटकांची पहिली तुकडी विशेष विमानाने मुंबईत सुखरूप परतली
- पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रसरकारने आज नवी दिल्ली इथं बोलावली सर्वपक्षीय बैठक
- भारताचा पोलाद उद्योग हा त्याच्या नव्या आत्मविश्वासाने भविष्याला सामोरा जात असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

**आणि**

- छत्तीसगढमधे सुरक्षादलांबरोबरच्या चकमकीत ३ माओवादी ठार

**<><><><><>**

जम्मू कश्मीर मध्ये दहशतवादी हल्ल्यानंतर तिथे अडकलेल्या महाराष्ट्रातल्या पर्यटकांची पहिली तुकडी विशेष विमानाने आज पहाटे साडेतीन वाजता मुंबई विमानतळावर सुखरूप पोहचली. शिवसेनेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांचं गुलाबपुष्प देऊन स्वागत केलं. काश्मिरमधे अडकलेल्या राज्याच्या नागरिकांना परत आणण्यासाठी आणखी विशेष विमानाची व्यवस्था झाली आहे. एअर इंडियाचं एक विमान 100 पर्यटकांना घेऊन आज मुंबईला येईल. इंडिगो एअरलाईन्सचं एक विमान 83 पर्यटकांना परत आणेल. ही दोन्ही विमानं सायंकाळी सुमारास मुंबईत उतरतील असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी समाजमाध्यमावर सांगितलं आहे. या विशेष विमानांचा खर्च राज्य सरकार करणार आहे.

पहलगाम हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले हेमंत जोशी, संजय लेले आणि अतुल मोने या तिघांवर काल रात्री डोंबिवलीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार

करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या तिघांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेतलं आणि त्यांच्या कुटुंबियांचं सांत्वन केलं. पनवेलचे दिलीप देसले यांच्या पार्थिवावर काल पनवेल मध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले संतोष जगदाळे आणि कौस्तुभ गणबोटे यांच्या पार्थिवावर पुण्यात वैकुंठधाम इथं अंत्यसंस्कार करण्यात आले.

विमानतळावर केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ, आरोग्यमंत्री दत्ता भरणे, आणि राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मृतांच्या कुटुंबांशी संवाद साधला आणि त्यांचं सांत्वन केलं.

**<><><><><>**

पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ राज्यात विविध ठिकाणी बंद पुकारला आहे. अनेक ठिकाणी सार्वजनिक तसंच मनोरंजनाचे कार्यक्रम रद्द केले  डोंबिवली शहरात आज या हल्ल्याच्या निषेधार्थ बंद पाळला आहे. बीड जिल्ह्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त उद्या होणारा भीमसंगीताचा कार्यक्रम रद्द करण्यात आला आहे. लातूर शहरात मुस्लीम समाजाने मेणबत्त्या पेटवून हल्ल्यात मरण पावलेल्यांना श्रद्धांजली अर्पण केली आणि या हल्ल्याचा तीव्र निषेध केला. धुळे शहरातही विविध संघटनांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर घोषणाबाजी करून आंदोलन केलं. अमरावती जिल्ह्यात विविध संघटनांनी उद्या जिल्हा बंदचं आवाहन केलं आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमधे ठिकठिकाणी राज्य पोलीस दल आणि सुरक्षादलांनी संयुक्त शोधमोहिमा तीव्र केल्या आहेत.

जम्मू काश्मीरमध्ये उधमपूर इथं आज दहशतवाद्याबरोबरच्या चकमकीत सुरक्षा दलांचा एक जवान शहीद झाला. अतिरेक्यांसाठी सुरु असलेल्या लष्कराच्या शोधमोहिमेदरम्यान झालेल्या गोळीबाराला प्रत्युत्तर देताना हा जवान जखमी झाला होता. नंतर उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

कुलगाम जिल्हयातही काल सुरक्षा दलं आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. तंगमर्ग भागात अतिरेकी लपल्याची खबर मिळाल्याने काल संध्याकाळी त्यांच्यासाठी शोधमोहिम राबवताना ही चकमक झाली.

**<><><><><>**

पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रसरकारने आज नवी दिल्ली इथं सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. संध्याकाळी सहा वाजता ही बैठक संसद भवनात होणार असल्याचं सूत्रांनी सांगितलं. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग बैठकीत माहिती देण्याची शक्यता आहे. या हल्ल्यानंतर पाकिस्तानविरोधात सरकारने योजलेल्या उपायांबद्दल ते सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीना माहिती देतील.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमध्ये पहलगाम इथं मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानी उच्चायुक्तालयातल्या संरक्षण सल्लागारांना आठवडाभरात भारत सोडण्याचे आदेश दिले आहेत. तर इस्लामाबादमधल्या भारतीय उच्चायुक्तालयातून भारतीय संरक्षण, नौदल आणि हवाईदल सल्लागार परत बोलावलं आहे. भारत आणि

पाकिस्तानदरम्यानचा सिंधू पाणी करार तत्काळ प्रभावाने स्थगित करण्यात आला आहे. वाघा-अटारी सीमा बंद करण्यात आली आहे. सध्या भारतात आलेल्या पाकिस्तानी नागरिकांनी या मार्गाने येत्या १मे २०२५ पर्यंत परत जावं असं सांगितलं आहे. आज ४२ पाकिस्तानी नागरिक या मार्गाने परत गेले. सार्क व्हिसा सवलत योजना पाकिस्तानी नागरिकांसाठी रद्द करण्यात आली आहे.

भारताने पाकिस्तानविरुद्ध उचलेल्या धोरणात्मक पावलांविषयी पाकिस्तानने तिखट प्रतिक्रिया दिली आहे. पाकिस्तानला शेजारी देशाशी सलोख्याचे संबध राखायचे आहेत, मात्र भारताने कठोर पावलं उचललीच तर पाकिस्तान उत्तर द्यायला समर्थ असल्याची प्रतिक्रिया पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ त्यांनी दिली आहे. बलुचिस्तान आणि खैबर पख्तुनवामधल्या दहशतवादाला भारत खतपाणी घातल असल्याचा आरोपही त्यानी केला आहे.

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा काँग्रेस कार्यकारिणीनं तीव्र निषेध केला आहे. नवी दिल्ली इथं कार्यकारिणीच्या बैठकीनंतर काँग्रेसचे सरचिटणीस वेणुगोपाल यांनी बातमीदारांना ही माहिती दिली. पाकिस्तानच्या कारस्थानातून झालेला हा भ्याड हल्ला म्हणजे भारताच्या प्रजासत्ताक मूल्यांवर केलेला थेट आघात आहे. अशा विपरित स्थितीत शांत राहण्याचं आवाहन काँग्रेस कार्यकारिणीनं या बैठकीत केल्याचं त्यांनी सांगितलं.

अमरनाथ यात्रा लवकरच सुरु होणार आहे. देशभरातले लाखे भविक ही यात्रा करत असतात. त्यांच्या सुरक्षिततेला प्रधान्य दिलं पाहिजे, हे यावेळी नमूद करण्यात आलं.

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनियी गांधी, राहुल गांधी आणइ कार्यक्रिणीचे इतर सदस्य या बैठकीला उपस्थित होते.

<><><><><>

भारताचा पोलाद उद्योग हा त्याच्या नव्या आत्मविश्वासाने त्याच्या भविष्याकडे बघत असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. मुंबईत बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये आज आयोजित करण्यात आलेल्या इंडिया स्टील २०२५च्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांनी दूरस्थ पद्धतीने केलं, त्या वेळी ते बोलत होते. राष्ट्रीय पोलाद धोरणांतर्गत निर्धारित केलेल्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टांवर त्यांनी यावेळी प्रकाश टाकला. येत्या २०३० पर्यंत देशातलं पोलाद उत्पादन ३० कोटी टनांपर्यंत वाढवण्याचं उद्दिष्ट असल्यांचही ते यावेळी म्हणाले. तीन दिवसांच्या या आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि परिषदेत जागतिक पोलाद मूल्य साखळीतील आघाडीचे देश एकत्र येऊन, भविष्यातल्या वाटचालीवर चर्चा करणार आहेत.

<><><><><>

देशाचा विकास गावखेड्यांच्या विकासातून साकार होतो, या महात्मा गांधींच्या संकल्पनेवर पंचायती राज योजना राबवण्यात येत असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. बिहारमध्ये मधुबनी इथे पंचायती राज दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते

बोलत होते. गेल्या दशकात पंचायतींना बळकट करण्यासाठी पावलं उचलण्यात आली आहेत. २ लाखांहून अधिक ग्रामपंचायती इंटरनेटने जोडल्या गेल्या त्यामुळे अनेक आवश्यक दस्तऐवज मिळणं सुलभ झालं. स्वातंत्र्यानंतर अनेक दशकांनंतर ३० हजार नवीन पंचायत भवन इमारती बनवल्या गेल्या. तसंच दहा वर्षांत २ लाख कोटींहून अधिक निधी पंचायतींना मिळाला आहे असंही मोदी यावेळी म्हणाले.

या वेळी मोदी यांच्या हस्ते १३ हजार ५०० कोटी रुपये खर्चाच्या अनेक विकास प्रकल्पांचं पायाभरणी, उद्घाटन आणि लोकार्पण करण्यात आलं. यात जयनगर ते पाटणा दरम्यान धावणाऱ्या नमो भारत रॅपिड रेल्वे आणि सहरसा ते मुंबईत लोकमान्य टिळक टर्मिनस पर्यंत धावणाऱ्या अमृत भारत एक्सप्रेसचा समावेश आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय पंचायतराज दिनानिमित्त यवतमाळ इथं आज काँग्रेसने सत्याग्रह आंदोलन केलं. नागरिकांना आर्थिक सामाजिक न्याय देणारी लोकशाही व्यवस्था जगायला हवी. मात्र शासनाने गेल्या तीन ते पाच वर्षं स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतलेल्या नाहीत. त्यामुळे निर्णयप्रक्रियेत सामान्य माणसांचा सहभाग नगण्य होत चाललेला आहे अशी भूमिका या आंदोलनामागे असल्याचं माजी मंत्री वसंत पुरके यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

शून्य गोवर - रुबेला मोहिमेला आज नवी दिल्लीत केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांच्या उपस्थितीत सुरुवात झाली. यावर्षी जानेवारी ते मार्च दरम्यान देशातले ३२२ जिल्हे गोवरमुक्त तर ४८७ जिल्हे रुबेलामुक्त करण्यात यश

आल्याचं आरोग्य मंत्र्यांनी यावेळी सांगितलं. ही केवळ मोहीम नसून देशातल्या कोट्यवधी बालकांचं आयुष्य अधिक गुणवत्तापूर्ण करण्याचा मार्ग आहे, असं नड्डा म्हणाले. सर्व राज्यांचे मुख्यमंत्री आणि मंत्र्यांनी वार्ताहर परिषदा आणि जनसभा घेऊन लसीकरणाबाबत जनजागृती करावी असं आवाहनही त्यांनी केलं.

**<><><><><>**

छत्तीसगढ आणि तेलंगणाच्या सीमाभागात सुरक्षादलांबरोबरच्या चकमकीत आज ३ माओवादी अतिरेकी ठार झाले. बिजापूर जिल्ह्यातल्या कारेगुट्टा टेकड्यांच्या परिसरात माओवादी संघटनांचे म्होरके लपून बसले असल्याची खबर मिळाल्यावरुन संयुक्त शोध अभियान गेले २ दिवस सुरु आहे. छत्तीसगढ, तेलंगण आणि महाराष्ट्राच्या सुरक्षा दलांचं संयुक्त पथक ही मोहीम राबवत आहे. कारेगुट्टा टेकड्यांना सुरक्षा दलांनी वेढा घातला असून आतापर्यंतची ही सर्वात मोठी संयुक्त मोहीम असल्याचं अधिकृत सूत्रांनी सांगितलं.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज बंगळुरूमधे रायल चॅलेंजर्स बंगलोर आणि राजस्थान रॉयल्स दरम्यान सामना होणार आहे. सामना साडेसातवाजता सुरु होईल.

**//<><><><><>//**